Shivaji College of Arts, Hingoli

Impact Factor-8.632 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

**Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

**March-23**

**(CCCXCVIII) 398 -B**

## Research Methodology in Languages & Social Sciences




**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social Research & Development Training Institute Amravati

**Executive Editor**
**Dr. Pawar B. T.**
Principal
Late Dr. S. S. College Kalamnuri, Dist.- Hingoli

**Editor**
**Kendre D. B.**
Dept. of Hindi,
Late Dr. S. S. College Kalamnuri, Dist. - Hingoli

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar International Publication Amravati.( M.S.) INDIA**

**Impact Factor – (SJIF) –8.632** **ISSN – 2278-9308**

Shivaji College of Art's Hingoli

# B.Aadhar

**Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

# March -2023

**ISSUE No(CCCXCVIII) 398-B**

## Research Methodology in Languages & Social Sciences

Chief Editor
**Prof. Virag.S.Gawande**
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Executive-Editor
**Dr. Pawar B. T.**
Principal,
Late Dr. S. S. College Kalamnuri, Dist.- Hingoli

Editor
**Kendre D. B.**
Dept. of Hindi,
Late Dr. S. S. College Kalamnuri, Dist.- Hingoli

**Aadhar International Publication**

For Details Visit To : **www.aadharsocial.com**

**© All rights reserved with the authors & publisher**

'B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CCCXCVIII) 398-B
ISSN : 2278-9308
March , 2023

# INDEX-B



| No | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | मुलाखत तंत्राचा विश्लेषणात्मक अभ्यास | तुषार ज्ञानेश्वर पाटील | 1 |
| 2 | संशोधन अहवाल: एक स्वरूपात्मक अध्ययन | डॉ. ए. आर. वागडव , डॉ. एस. के. फोले | 3 |
| 3 | समाजिक शास्त्रे, भाषा विज्ञान: तुलनात्मक अध्ययन | डॉ. डी.के. खोकले | 7 |
| 4 | सामाजिक संशोधनाचे प्रकार | डॉ. शिंदे सुरेखा सदाशिवराव | 10 |
| 5 | संशोधन अहवाल लेखन | Dr. Shivaji Waybhase | 13 |
| 6 | सामाजिक शास्त्रातील संशोधनाचे प्रकार | प्रा.डॉ. अशोक गंगाराम अंभोरे | 17 |
| 7 | तथ्य संकलन प्रश्नावली पध्दतीचा अभ्यास | डॉ. बबन आमले | 19 |
| 8 | सामाजिक संशोधनात संगणकाचा उपयोग | डॉ. चांगदेव निवृती मुंढे | 23 |
| 9 | बुद्धिबळ संशोधनातील उपयोगिता एक अभ्यास | डॉ. दिनकर हंबर्डे | 29 |
| 10 | समस्येच्या गर्भात शोधाची जननी : संशोधन समस्यासूत्रण | डॉ. नवगणकर राजाभाऊ व्यंकटराव | 35 |
| 11 | सामाजिक संशोधनाचे सर्वांगीण महत्व आणि उपयुक्तता | डॉ. विलास सोमाजी पवार | 41 |
| 12 | तथ्य संकलनाचे प्रकार : एकचिंतन | डॉ. सुखलाल शामराव राठोड | 46 |
| 13 | तथ्य संकलनाच्या पद्धती | डॉ.काशीद.एस. व्ही | 52 |
| 14 | सामाजिक संशोधनाचे प्रकार | डॉ.बिडवे टी.एस. | 54 |
| 15 | साहित्याचे संशोधन | प्रा.डॉ. संगीता मुंढे | 58 |
| 16 | लोकप्रशासनातील विकासाभिमुख पाऊलखुणा | प्रा. डॉ. अमोल काळे | 61 |
| 17 | मराठी ग्रामीण कादंबरीतील संशोधनाचे महत्त्व | प्रा. डॉ. कृष्णा इंगळे | 65 |
| 18 | संशोधनातील मुलाखतीचे महत्त्व | प्रा. डॉ.जाधव अशोक काकासाहेब | 68 |
| 19 | संख्यात्मक संशोधन एक आढावा | प्रा. संध्या दत्तराव कदम | 71 |
| 20 | संशोधन अहवाल लेखन | प्रा. डॉ शिवाजी दहिकांबळे | 75 |
| 21 | संशोधन विश्लेषणात सांख्यिकीय तंत्रांची भूमिका | प्रा.डॉ. रामदास डी.मुकटे | 79 |
| 22 | संशोधन अहवाल लेखनातील कौशल्य | प्रा.डॉ. सुभाष एन. सातव | 83 |

| | | |
|---|---|---|
| 23 | सामाजिक संशोधनात प्रश्नावलीची उपयुक्तता प्रा.डॉ. हुरगूळे एन. आर. | 86 |
| 24 | संशोधनात माहिती संकलनाच्या पध्दती आणि प्रश्नावली : एक अभ्यास प्रा.माणिक भिकाजीराव डोखळे | 90 |
| 25 | संशोधनातील तथ्य संकलन पद्धती. संतोष दत्तराम जाधव | 96 |
| 26 | सामाजिक संशोधनातील मुलाखत सुची चे गुण - दोष डॉ. रेखा बालाजीराव पाटील | 102 |
| 27 | इतिहास लेखनामध्ये ॲनल्स परंपरेचे योगदान डॉ. विजयकुमार प्रल्हादराव भांजे | 105 |
| 28 | सामग्री विश्लेषण आणि लेखन प्रा. राखी रामकृष्ण इंगळे | 108 |
| 29 | प्रश्नावली चे प्रकार प्रा. डॉ. रमेश वि. मोरे | 112 |
| 30 | संशोधन कार्यात नमुना निवड आणि त्याचे फायदे प्रा. डॉ. डी. एस.केंद्रे | 115 |
| 31 | संशोधनातील नमुना निवडीची तंत्रे डॉ. गणपत रामसिंग पवार | 119 |
| 32 | उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरता : एक भौगोलिक अभ्यास प्रा.डॉ.शिरमाळे महेबुबपाशा बाबूमीयाँ | 123 |
| 33 | काव्य समीक्षा आणि संशोधनाच्या दिशा : विशेष संदर्भ "मनमौन" कवितासंग्रह डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | 128 |
| 34 | सामाजिकशास्त्रामधील संशोधनाची आवश्यकता एक चिंतन डॉ. आकाश शेषराव नांगर | 135 |
| 35 | सामाजिक संशोधनातील नीतीमूल्य विचार डॉ. शंकर लेखणे | 140 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CCCXCVIII) 398-B
ISSN : 2278-9308
March , 2023

# साहित्याचे संशोधन

प्रा.डॉ. संगीता मुंढे
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली. ,मो. 8888061365 ,ईमेल – sangitamundhe1@gmail.com

प्रस्तावना

गरज ही शोधाची जननी असते असे म्हटले जाते. मानवाने आज जी प्रगती केली आहे त्या पाठीमागे त्याची जिज्ञासू वृत्ती, गरज ही कारणीभूत असल्याचे दिसून येते. आजूबाजूच्या प्रत्येक घटना,वस्तू व सृष्टीविषयी त्याच्या मनात कुतूहल असते. हे कुतूहल त्याला स्वस्थ बसू देत नाही. त्यातूनच संशोधन जन्माला येते. हजारो वर्षाच्या अनुभवजन्य ज्ञानावर माणसाने प्रगतीचे एकेक टप्पे गाठले आहेत. आपल्याला आलेल्या अनुभवाची सांगड तो पुढच्या अनुभवाशी घालून त्यातून काही निष्कर्ष, तथ्य मांडत असतो. अशा पद्धतीने पिढ्या न पिढ्या अनुभवजन्य ज्ञान साठत जाते. या ज्ञानाची सांगड नव्याज्ञानाशी तो घालत असतो. जुने ज्ञान पुन्हा पुन्हा पडताळून पाहत असतो. त्यातून काही नवे हाती लागले तर ते मांडत असतो. अशा पद्धतीने केलेले परीक्षण, निरीक्षण म्हणजे देखील संशोधनच असते. यातूनच नवनवीन माहिती ही समोर येत असते.नवीन गोष्टीचाशोध लागतो. जी नवीनमाहिती मिळाली त्या माहितीची वस्तुनिष्ठता तपासली जाते. त्यातून काही निष्कर्ष,सिद्धांतमांडलेजातात. ते संपूर्ण समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे असतात.

संशोधन म्हणजे काय? हे अनेक अभ्यासकांनी सांगितले आहे. वेबस्टरच्या कोशात,"संशोधन म्हणजे, कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये व तत्वे परीक्षणासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास." असे म्हटले आहे. म्हणजे नवीन काहीतरी शोधणे व जुने पुन्हा पुन्हा पडताळून पाहणे हे संशोधनात अभिप्रेत असलेले दिसते. वैज्ञानिक संशोधन किंवाशास्त्रीयसंशोधन आणि सामाजिक संशोधन हे संशोधनाचे प्रमुख दोन प्रकार मानले जातात. शास्त्रीय संशोधनात संशोधन करत असतानासंशोधकप्रयोगशाळेत विशिष्ट वस्तू किंवा संकल्पना या शास्त्रीय पद्धतीने हाताळत असतो. त्याचप्रमाणे सामाजिक शास्त्रातील संशोधक विशिष्ट श्रद्धा संकल्पना किंवा प्रत्यीकांची हाताळणी करून त्यातून काही निष्कर्ष काढतअसतो. हे निष्कर्ष त्यांनी केलेल्या अभ्यासपूर्ण ज्ञानाचे फलित असते. आधार पुरावे देऊन साधक, बाधक पद्धतीने तो हे निष्कर्ष काढत असतो. त्याच्या या संशोधनामुळे ज्ञानाच्या कक्षा रुंदावतअसतात. ज्ञानात सुधारणा किंवा भर पडत असते किंवा ज्ञानाची सत्यता प्रमाणीत होत असते. संशोधनातून काहीतरी निष्कर्ष हा काढला जातो. सिद्धांत मांडला जातो. हा सिद्धांत किंवा निष्कर्ष हे समाजासाठी उपयोगी असतात. त्यातून समाजाच्या प्रगतीला हातभार लागत असतो, ज्ञानाच्या कक्षा वृंदावत असतात.

मानवी जीवनात साहित्य किंवा कलेला खूप महत्त्वाचे स्थान आहे. साहित्य हे माणसाच्या भावभावनांशी निगडित असते. माहित्य हे एकाच वेळी व्यक्तिगत आणि सामाजिकही असते. ती एका व्यक्तीची निर्मिती असली तरी व्यक्ती हा समाजाचा घटक असल्यामुळे त्याच्या साहित्यातून आलेले अनुभव हे एकाच वेळी व्यक्तिगत आणि सामाजिकही असतात. असे असले तरी साहित्य हे त्या साहित्यीकाची नवनिर्मिती असते. साहित्यिकाच्या कल्पनाशक्ती,सृजन शक्तीची ती देनअसते. त्यामुळे साहित्याचे हे स्वरूप साहित्याचे संशोधन करताना लक्षात घ्यावे लागते. वैज्ञानिक किंवा सामाजिक संशोधनापेक्षा साहित्याच्या संशोधनाचे स्वरूप हे वेगळे ठरते ते यामुळेच. वैज्ञानिकसंशोधनाचे काटेकोरनिकष साहित्याच्यासंशोधनाला लावता येतनाहीत. साहित्य हे त्या त्या समाजाचा सांस्कृतिक दस्तऐवज असतो. ते संस्कृतीरूप असले तरी, संस्कृती अधिक संपन्न करण्याचे ते काम करते.डॉ.वा.भा. पाटील यांच्या मते,"सामाजिक परिस्थितीतून साहित्याची निर्मिती होत असली तरी ते साहित्य, सामाजिक व वैयक्तिक जीवनाला विशेष प्रकारची संपन्नता प्राप्त करून देते. अर्थात साहित्य स्वतः संस्कृतीरूप होता होताच संस्कृतीचा विकास घडवून आणते."१ साहित्याच्या या स्वरूपामुळेच ते अनेक ज्ञानशाखाशी संबंधित असते. मानवाने जसजशी प्रगती केली तसतसे साहित्याचे स्वरूपही बदलत गेले आहेत एका अर्थाने साहित्य हा समाजाचा आरसा मानल्याजातो. समाजातील बऱ्या वाईट घटनांचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. त्यामुळे तो एक महत्त्वाचा सामाजिक दस्तऐवज मानला जातो. एखाद्या समाजाच्या प्रगतीचा,वाटचालीचा, संस्कृतीचा अभ्यास करायचा असेल तर त्या समाजाच्या साहित्याचा अभ्यास हा महत्त्वाचा ठरतो.

साहित्य हे एकाच वेळी अनेक ज्ञान शाखांशी संबंध ठेवून असते. इतिहास,भूगोल,राज्यशास्त्र,समाजशास्त्र,मानसशास्त्र,नीतीशास्त्र, भाषाशास्त्र या वेगवेगळया ज्ञानशाखांशी साहित्याचा अतूट असा संबंध येतो. तोही साहित्याच्या संशोधनात लक्षात घ्यावा लागतो.साहित्यसंशोधन हे इतिहाससंशोधनासारखी निरंतरचालणारी प्रक्रिया आहे.लिखित आणि मौखिकसाहित्याच्याआधारे साहित्यसंशोधन केले जाते. साहित्याच्यासंशोधनातसमीक्षेलामहत्वाचे स्थान आहे. संशोधनआणिसमीक्षायात मुलभूतफरक आहे. साहित्यसंशोधन हे साहित्याच्यामूळस्वरूपाचा शोधघेण्याच्याउद्देशानेकेले जाते,तर समीक्षाही मूल्यमापनासाठीकेलीजाते. लेखक एखादी साहित्यकृती जेव्हा लिहीत असतो तेव्हा तो त्या त्या साहित्य प्रकाराला तर समृद्ध करत असतोच; पण त्याचवेळी तेसाहित्य भाषेच्या दृष्टीनेही महत्त्वाचेअसते. ती ती भाषा त्यामुळे समृद्ध होत असते. त्याचवेळी आशयाच्या पातळीवरही भर घातलेली असते. कारण कोणता तरी एखादा नवीन विषय त्यात आलेला असतो. त्यामुळेच आशयात भर पडते. साहित्याच्या या स्वरूपामुळेच साहित्य हे सर्व समावेशक ठरते. त्यामुळे साहित्याच्या संशोधनात या सर्व बाबी लक्षात घ्याव्या लागतात.

सत्य शोधून काढणे हा संशोधनाचा मुख्य हेतू असतो. वा.भा. पाटील यांच्या मते,"ज्ञानाच्या कोणत्याही शाखेत नवीन तथ्याच्या,विचारांच्या अवधारणांचा आणि सिद्धांताच्या निर्मितीसाठी किंवा शोधासाठी कार्यान्वित केलेली क्रमबद्ध प्रक्रिया म्हणजेच संशोधन होय."२ साहित्याच्या बाबतीतही हीच पद्धत लागू होते. प्रथमतः संशोधकाला विषय निश्चित करावा लागतो. विषय निश्चित झाल्यानंतर संशोधकाला संशोधनाची रूपरेषा तयार करावी लागते. यात संशोधकाला आपल्या विषयाचे महत्त्व सांगता आले पाहिजे. त्या विषयासंबंधी आधी झालेले संशोधन ज्ञात पाहिजे. संशोधनाचा उद्देश सांगता आला पाहिजे. तसेच आपल्या संशोधनाची गृहीतकृत्ये मांडता आली पाहिजेत. संशोधन पद्धती, तथ्याचे संकलन करण्याच्या पद्धती, संशोधनाचा कालावधी इत्यादी सर्वांचा समावेश संशोधनाच्या आराखड्यात होतो. यानंतर विषयाशी संबंधित तथ्य गोळा केली पाहिजेत. उद्दिष्टे ठरवता आली पाहिजेत. संशोधकाला साहित्य आणि समीक्षा याबद्दल पुरेसे ज्ञान असले पाहिजे. सर्व तथ्य तपासून स्वतःचे मत मांडता आले पाहिजे. साहित्य हे मानवी भावभावनांशी निगडित असल्यामुळे मानवी मनोव्यापाराचे ज्ञान त्याला असले पाहिजे. भावनांची त्याला वस्तुनिष्ठ चिकित्सा करता आली पाहिजे. अनेक वेळेला एकाच लेखकासंबंधी वेगवेगळया अभ्यासकांचे वेगवेगळी मते असू शकतात. त्याचा तर्कसंगत पद्धतीने पुराव्यानिशी ऊहापोह करता आला पाहिजे. हे सर्व चिकित्सक पद्धतीने संशोधकाला शोधता आले पाहिजे.

साहित्याच्या संशोधनात प्रामुख्याने क्षेत्रीय संशोधन व ग्रंथालयीन आधारावर केलेले संशोधन या दोन पद्धतीने तथ्य संकलित करून संशोधन केले जाते. प्रामुख्याने ग्रंथालय हीच साहित्य संशोधनासाठी महत्त्वाची तथ्य गोळा करण्याची ठिकाणंआहेत. सध्या इंटरनेटच्या काळात वेगवेगळया वेबसाईटवरूनही तथ्य गोळा करता येतात. पण त्याची विश्वासार्हता तपासली पाहिजे. हे सर्व टप्पे पार पडल्यानंतर संशोधन करता हा प्रत्यक्ष संशोधनास सुरुवात करतो. साहित्याच्या संशोधनात वाचनाला खूप महत्त्व आहे. अभ्यास विषयाचे प्रमुख आधारभूत ग्रंथ व दुय्यम ग्रंथ अशी वर्गवारी करता येते. प्रमुख आधार ग्रंथाचे वारंवार वाचन त्याने केले पाहिजे.तथ्याचे वर्गीकरण, विषयाला अनुसरून माहितीची साठवणूक,निष्कर्ष, तुलना हे करत असताना वेगवेगळया अभ्यास पद्धतीचा वापर केला पाहिजे. एकूण चिकित्सक अभ्यासातून संशोधकाला स्वतःची अशी मते मांडता आली पाहिजेत. त्यासाठी योग्य ते पुरावे आधार देता आले पाहिजेत. वस्तुनिष्ठ पणे परीक्षण करून संशोधकास आपली भूमिका मांडावी लागते.

संशोधनामधला शेवटचा टप्पा म्हणजे प्रबंध लेखन. हे करत असताना संशोधकाने स्वतःच्या भाषेत ते करावे.डॉ. सुधाकर शेलार यांच्या मते,"संशोधनाची मौलिकता नवीन तथ्यांचे प्रकटन करण्यावर जशी अवलंबून असते तशी ती ह्या तथ्यांची मांडणी कशा प्रकारे केली जाते त्यावरही अवलंबून असते." ३म्हणजे संशोधनाअंती आपण मिळवलेली माहिती त्यावरून काढलेले निष्कर्ष हे कशा पद्धतीने मांडतो यावरही त्या संशोधनाचे यश अवलंबून असते.प्रबंध लेखन करताना शक्यतोप्रमाण भाषेचा वापर करावा. संदिग्धता लिखाणात असू नये. नेमक्या मोजक्या शब्दात आपलं म्हणणं संशोधकालामांडता आलं पाहिजे. संशोधन आराखड्याप्रमाणे संशोधन प्रबंध लेखन हे झाले पाहिजे. साहित्यामध्ये भाषा हे माध्यम महत्त्वाचे असते. त्यामुळे भाषा सुसंगत नेटकी वापरावी.व्याकरणाच्या चुका त्यात असू नयेत. लेखन हे लेखन नियमानुसार असले पाहिजे.

मराठी साहित्य संशोधनाचा विचार केला तर प्राचीन मराठी साहित्याच्या निर्मितीचे श्रेय महानुभाव संप्रदायाला जाते. महानुभाव संप्रदायाला मराठी साहित्याची गंगोत्री असे म्हटले जाते. तसेच साहित्य संशोधन आणि पाठ चिकित्सेचा प्रारंभही महानुभावियांनीच केलेला दिसतो. मराठी भाषेतील पहिला गद्यग्रंथ लिहिणारे म्हाइंभट हे

पहिले संशोधक ठरतात.त्यांनी लीळाचरित्र हा ग्रंथ ज्या पद्धतीने लिहिला त्यावरून त्यांची चिकित्सकृती दिसून येते.केशीराज बास यांनी महानुभाव पंथाचे तत्वज्ञान व आचारधर्म सांगणारा सूत्रपाठ नावाचा ग्रंथ लिहिला. हेही त्यांचे संशोधनच होते. त्यानंतरच्या काळात वारकरी पंथातील संत एकनाथांनी सोळाव्या शतकात पहिल्यांदा ज्ञानेश्वरीची पाठशुद्ध प्रत तयार केली. त्यानंतरच खऱ्या अर्थाने संशोधनाला सुरुवात झाली ती एकोणिसाव्या शतकात. आधुनिक पद्धतीने साहित्य संशोधन या काळात सुरू झाले. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी 'निबंधमाला' सुरू केली आणि संशोधनाचा एक वस्तूपाठच त्यांनी घालून दिला. निबंधमालेपासून प्रेरणा घेऊन नंतरच्या काळात अनेक संशोधक हे साहित्याच्या संशोधनाकडे वळलेले दिसतात.यात प्रामुख्याने प्राचीन ग्रंथाच्या पाठ शुद्ध प्रति तयार करणे तसेच लोकसाहित्याचे संशोधन हे मोठ्या प्रमाणावर झालेले आहे.वि.का.राजवाडे,सरदेसाई, डॉ.वि.ल. भावे,डॉ. वि.भी.कोलते,श.गो.तुळपुळे, कृ.पा.कुलकर्णी, श्री.ना.बनहट्टी,रा.श्री.जोग,प्र. न.जोशी,य.नं.केळकर,अ.का.प्रियोळकर, स.ग.मालसे, वि.बा. प्रभुदेसाई,डॉ. रा.ची.ढेरे, सरोजिनी बाबर, दुर्गाबाई भागवत, कमलाबाई देशपांडे, प्रभाकर मांडे, गंगाधर मोरजे, म.वा. धोंड विठ्ठल वाघ, तारा भवाळकर,द.दी. पुंडे इत्यादी अनेक संशोधकांनी मराठी साहित्य संशोधनात मोलाची भर घातली आहे.

आज मानवी जीवनाचे एकही क्षेत्र नाही ज्याला साहित्याने स्पर्श केला नाही. मानवाने केलेली प्रगती, बदलत गेलेले मानवी जीवन, मानवा पुढील समस्या या सर्वांचे चित्रण साहित्यात आलेले आहे.विज्ञान तंत्रज्ञानाच्या काळात साहित्याचे रूप अमुलाग्र बदलले आहे. लिखित साहित्याची जागा आज ऑनलाईन साहित्य घेतांनादिसत आहे. त्यामुळे साहित्य संशोधनाचे क्षेत्र ही विस्तारले आहे. आज साहित्याचा अभ्यास करणाऱ्या संशोधकास अनेक विषय उपलब्ध आहेत. तो आपल्या आवडीनुसार विषय निवडू शकतो.प्राचीन साहित्य, साहित्यशास्त्र, भाषाशैली,भाषाविज्ञान, भाषांतरित साहित्य,समीक्षा, वेगवेगळे वांग्मय प्रकार, वाङ्मयाचा इतिहास, तुलनात्मक साहित्यअभ्यास, लोकसाहित्य या मुख्य विषयाला अनुसरून अनेक ऊप विषयांवर संशोधन करता येते. सध्याच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या काळात अजून विषयात भर पडेल.सध्याच्या काळाच्यादृष्टीने साहित्याचा अन्वयार्थलावता आला पाहिजे. जे अभिजात साहित्य आहे ते कधीच जुने होत नाही. सद्य समाजाची गरज लक्षात घेऊन त्या साहित्याचे संशोधनझाले पाहिजे.साहित्याचे संशोधन हे समाजाला दिशा देण्याचे काम करत असते.

निष्कर्ष

१) साहित्याचे संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

२) साहित्य हे मानवी भावभावनांशी निगडित असल्यामुळे शास्त्रीय पद्धतीचे काटेकोर निकष साहित्याच्या संशोधनाला लावता येत नाहीत.

३) मानवी संस्कृतीच्या अभ्यासासाठी साहित्याचे संशोधन महत्त्वाचे ठरते.

संदर्भ

१) पाटील वा.भा. - संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव. चौथी आ.पृ.२९१

२) उ.नि.२९२

३) डॉक्टर शेलार सुधाकर-साहित्य संशोधन वाटा आणि वळणे, अक्षर वाङ्मय प्रकाशन पुणे,पहिली आवृत्ती२०१९पृ.१५

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)